ePaper मुकेश अंबानी यांना धमकीचे पाच ईमेल, 400 कोटींच्या खंडणीची मागणी,




| वर्ष - 7 | अंक - 179 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 6 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- भारताची विजयी घौडदौड सुरूच!
- रणदीप चढणार बोहल्यावर!
- २२ बेटींग ऑनलाइन ॲपवर बंदी!
- साताऱ्यात आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ




।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून प्रस्तावित असलेल्या पुनावळे कचरा डेपो आरक्षण रद्द करावे आणि पर्यायी जागेत कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारावा. या मागणीसाठी परिसरातील सुमारे ७ हजार दुचाकीस्वाराची प्रचंड रॅली काढण्यात आली. सोसायटीधारकांसह भूमिपुत्रांनी या रॅलीमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि प्रशासनाचा निषेध नोंदवला. एखाद्या प्रकल्पाविरोधात आजपर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्याप्रमाणात दुचाकी रॅली काढण्यात आली. त्यामुळे प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

## » प्रस्तावित कचरा डेपोविरोधात सात हजार दुचाकीस्वारांची रॅली

# पुनावळेकरांचा आक्रोश!

## » प्रशासनाविरोधात संताप : सोसायटीधारकांसह भूमिपूत्र उतरले रस्त्यावर!




### कचरा डेपो हटवा...पुनावळे वाचवा

»'सेव्ह पुनावळे'... कचरा डेपो हटवा...पुनावळे वाचवा... अशा घोषणा देत सोसयटीधारक दुचाकी रॅलीमध्ये सहभागी झाले. विशेष म्हणजे, काळ्या रंगाचे शर्ट आणि दंडावर काळी फित बांधून प्रशासनाचा निषेध करण्यात आला. कोयते वस्ती येथून रॅलीला सुरूवात झाली. त्यानंतर पुनावळे गाव, लाईफ रिपब्लिक सोसायटी, मारुंजी, विनोदेनगर, भुमकर चौक, ताथवडे, पुनावळे येथील वनीकरण या ठिकाणी रॅलीचा समारोप करण्यात आला. रॅलीमध्ये महिलांचा समावेश लक्षणीय होता. प्रस्तावित कचरा डेपोविरोधात सोसायटीधारकांच्या मनात असलेला संताप या निमित्ताने पहायला मिळाला.









### सर्वपक्षीय राजकीय नेत्यांची पाठिंबा...

»पुनावळे कचरा डेपोविराधात आंदोलनामध्ये भाजपाच्या विद्यमान आमदार अश्विनी जगताप यांनी 'कोणत्याही परिस्थितीत कचरा डेपो होवू देणार नाही' अशी भूमिका घेतली. मावळचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा सुरू केला आहे. तसेच, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी रॅलीत सहभाग घेतला. भाजपाचे आमदार महेश लांडगे, शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी कचरा डेपोबाबत स्थानिक नागरिकांना विश्वासात घ्यावे आणि डेपो रद्द करण्याबाबत निर्णय घ्यावा, अशी भूमिका घेतली आहे.

राज्य शासनाच्या वनविभागाच्या जागेत आणि पुनावळे हद्दीत महापालिका प्रशासन कचरा डेपो उभारणार आहे. यामुळे पुनावळे, ताथवडे, मारुंजी, जांबे, हिंजवडी, लाइफ रिपब्लिक टाऊनशिप, वाकड या भागातील सोसायटीधाकर आणि रहिवाशांना मोठा फटका बसणार आहे. २००८ साली कचरा डेपोचे आरक्षण टाकण्यात आले. त्यानंतर या भागात मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प आणि लोकवस्ती झाली आहे. कचरा डेपोमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होणार असून, जलाषयही दुषित होणार आहेत. तसेच, नागरी अरोग्याचाही प्रश्न निर्माण होणार आहे. या विरोधात रविवारी दुचाकी रॅली आणि चिपको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला आहे. प्रस्तावित वृक्षतोडी विरोधात झाडांना आलिंगन देऊन प्रशासनाचा निषेध करण्यात आला. पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्था फेडरेशन आणि पुनावळे रेसिडेंट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पुनावळे येथे वनविभागाची २६ हेक्टर जागा आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने मागणी केल्यामुळे ही जागा महापालिकेकडे हस्तांतरित केली आहे.

# आरक्षण देण्याची इच्छाशक्ती आहे का?

## तारखांचा घोळ करून फसवणूक : सुप्रिया सुळे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाला सरसकट आरक्षण देण्यासंदर्भात मनोर जरांगे पाटील यांनी दोन महिन्यांची मुदत देत मोठेपणा दाखविला आहे. राज्यातील तिघाडी सरकार मात्र तारखांचा घोळ करण्यात व्यस्त आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याची इच्छाशक्ती या तिघाडी सरकारमध्ये आहे का, हा खरा प्रश्न आहे,**




असा सवाल बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला. उपमुख्यमंत्री अजित पवार डेंग्यूने आजारी होते. आरोग्याच्या बाबतीत राजकारण करू नये. त्यांच्या तब्येतीची चैकशी करत आहे, असे सांगत त्यांनी अजित पवार यांचा आजार राजकीय नव्हता, हे स्पष्ट केले. चांदणी चैकातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आला आहे. उड्डाणपूल उभारण्यात आल्यानंतरही या भागातील समस्या कायम राहिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सुप्रिया सुळे यांनी चांदणी चैकाला भेट देत चर्चा केली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. माजी नगरसेवक सचिन दोडके आणि काका चव्हाण यावेळी उपस्थित होते. चांदणी चौकातील संपूर्ण प्रकल्पाची श्वेतपत्रिका काढण्याची मागणीही सुळे यांनी केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मुख्यमंत्री झालेले पाहायला आवडेल, अशी प्रतिक्रिया त्यांच्या आईंनी दिली आहे. यासंदर्भात बोलताना कोणत्या आईला तसे वाटणार नाही, असे सुळे यांनी सांगितले. सुळे म्हणाल्या की, पाच महिन्यांपूर्वी कांदा प्रश्न पेटणार असल्याचे सांगितले होते. वाणिज्य मंत्री पियुष गोएल यांनी त्याची दखल घेतली नाही.

### सरकार शेतकरी विरोधी

» चांदणी चौकातील संपूर्ण प्रकल्पाची श्वेतपत्रिका काढण्याची मागणीही सुळे यांनी केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मुख्यमंत्री झालेले पाहायला आवडेल, अशी प्रतिक्रिया त्यांच्या आईंनी दिली आहे. यासंदर्भात बोलताना कोणत्या आईला तसे वाटणार नाही, असे सुळे यांनी सांगितले. सुळे म्हणाल्या की, पाच महिन्यांपूर्वी कांदा प्रश्न पेटणार असल्याचे सांगितले होते. वाणिज्य मंत्री पियुष गोएल यांनी त्याची दखल घेतली नाही. कांद्यावर चाळीस टक्क्यांचा कर चुकीच्या पद्धतीने लावण्यात आला आहे. केंद्रातील आणि राज्यातील सरकार शेतकरी आणि महिला विरोधी आहे.

# कचरा डेपोप्रश्नी उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे पाठपुरावा करू : नाना काटे

## पुनावळेतील नागरिकांनी घेतली काटे यांची भेट

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुनावळे येथील प्रस्तावित कचरा डेपो स्थलांतरित करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी नागरिकांना दिले आहे. आयटी परिसरालगत असलेला पुनावळे, मारुंजी, जांभे, नेरे, विनोदेवस्ती या परिसरातील अनेक सोसायटी धारक नियोजित कचरा डेपो विरोधात रस्त्यावर उतरून पुनावळे कचरा डेपो रद्द करण्यासाठी निदर्शने केली. बाईक रॅली आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर नागरिकांनी काटे यांची भेट घेऊन उपमुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करण्याची विनंती केली. या वेळी काटे यांनी हे आश्वासन दिले..**



काटे यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले की, प्रशासनाने येथील जागा ताब्यात घेण्यासाठी वन विभागाला चंद्रपूर येथे जमीन विकत घेऊन देण्याची प्रक्रिया देखील सुरू आहे. मोशीतील कचरा डेपोची क्षमता संपुष्टात येत असल्याने पुनावळे येथे लवकरात लवकर कचरा डेपो उभारण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.

नागरिकांचा विरोध पाहता पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे कचरा डेपो विरोधात निवेदने देऊन स्थलांतरित करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे काटे म्हणाले. महापालिकेने 2008 मध्ये पुनावळे येथे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मंजूर केला आहे. त्यावेळी पुनावळे भागात नागरीकरण झालेले नव्हते. मात्र, 15 वर्षात या भागात मोठे नागरीकरण झाले असून पुनावळे परिसरातील लोकसंख्या एक लाख पेक्षा अधिक झाली आहे. इथले नैसर्गिक वातावरण, बाजूला असलेले आयटी पार्क आणि पुनावळे येथे आरोग्य, शिक्षण, गृह प्रकल्प या सुविधांमुळे नागरिक इथे राहण्याला पसंती देत आहेत. 2008 पासून प्रस्तावित असलेल्या कचरा डेपोला स्थानिक सोसायटीधारक विरोध करत आहेत.

कचरा डेपोमुळे पुनावळे येथील नैसर्गिक संपत्ती नष्ट होईल. नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागेल. हा प्रकल्प शहराच्या पश्चिम दिशेला आहे. हा कचरा डेपो झाल्यास पुनावळेतील नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागेल, अशी नागरिकांची तक्रार आहे.

> “ पुनावळे भागात अनेक आयटी कर्मचारी वास्तव्यास आले आहेत. या कचरा डेपोच्या सभोवताली मोठ्या प्रमाणात टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या आहेत. मध्यभागी होणारा पुनावळे कचरा डेपो मानवी जीवनाचा विचार करता शहराच्या अन्य भागात स्थलांतरित करावा, अशी मागणी पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे करणार आहे.
> **- नाना काटे,** माजी विरोधी पक्षनेता, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# एसटीची दरवाढ मागे घ्या : रवींद्र धंगेकर



। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

पावसाने पाठ फिरवल्याने राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये सध्या दुष्काळ आहे. पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे बळीराजा चिंतेत आहे. तर दुसरीकडे, सातत्याने बेरोजगारी, महागाई वाढत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकही आर्थिक संकटात आहे. या स्थितीत जनतेला सवलती आणि आर्थिक मदत देण्याऐवजी एसटी बसच्या तिकीट दरात वाढ करणे जाचक आणि अन्यायकारक आहे.

ही दरवाढ सरकारने तत्काळ मागे घ्यावी, अशी मागणी काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी केली. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर एसटी बसच्या तिकीट दरात ७ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून १० टक्के वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या निर्णयाला विरोध दर्शवत आमदार रवींद्र धंगेकर यांनी मुख्यमंत्री तथा परिवहन मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे दरवाढ मागे घेण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. सध्याच्या दुष्काळाच्या आणि दररोज वाढणाऱ्या महागाईच्या वातावरणात दिवाळी हा सण साजरा कसा करायचा, हा प्रश्न राज्यातील जनतेसमोर आहे. अशा स्थितीत आणि ऐन सणासुदीच्या काळात राज्य सरकारने बसच्या तिकीट दरामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारचा हा निर्णय अतिशय अन्यायकारक आहे. त्यामुळे सरकारने संवेदनशीलता दाखवून तिकीट दरवाढ करण्याचा निर्णय तत्काळ मागे घ्यावा, असे धंगेकर यांनी म्हटले आहे.

## वाहतूक पोलिसांची ध्वनीप्रदूषण जनजागृती

# पिंपरी-चिंचवडमध्ये 'नो हॉर्न डे'!

### » गेल्या 15 दिवसांत पोलिसांची 6,178 वाहनांवर कारवाई

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी सतत हॉर्न वाजवल्याने होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाच्या समस्येवर उपाय म्हणून 'नो हॉर्न डे' ही अनोखी मोहीम सुरू केली आहे. ही मोहीम दर सोमवारी पाळली जाणार आहे, आणि वाहतूक पोलिस अधिकारी शाळा, महाविद्यालये, आयटी कंपन्या आणि एमआयडीसी भागात जनजागृती करण्यासाठी आणि चालकांना या नियुक्त दिवशी हॉर्न वाजवण्यापासून परावृत्त करण्यासाठी प्रोत्साहित करतील**

गजबजलेल्या शहरी जीवनात, वाहतूक कोंडीमुळे वाहनचालकांमध्ये अनेकदा निराशा निर्माण होते, परिणामी जाममधून मार्गक्रमण करण्यासाठी वारंवार हॉर्न वाजवावा लागतो. या सततच्या ध्वनिप्रदूषणाचा परिणाम वाहनचालकांच्या आरोग्यावर तर होतोच शिवाय आसपासच्या नागरिकांची शांतताही भंग पावते. या सततच्या समस्येशी कान आणि मानसिक विकारांची प्रकरणे जोडली गेली आहेत. विविध प्रादेशिक परिवहन कार्यालये, सामाजिक संस्था आणि वाहतूक संघटनांनी जनजागृतीसाठी प्रयत्न केले, परंतु वाहनचालकांनी याकडे दुर्लक्ष केले.

या समस्येचा सामना करण्यासाठी पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिस वाहनचालकांना दर सोमवारी 'नो हॉर्न डे'मध्ये सहभागी होण्याचे आवाहन करत आहेत. अनावश्यक हॉर्न वाजवण्याचे दुष्परिणाम आणि वाढत्या ध्वनिप्रदूषणाच्या परिणामांबद्दल लोकांना शिक्षित करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. गेल्या 15 दिवसांत पोलिसांनी 6,178 वाहनांवर कारवाई करून एकूण 61.71 लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. प्रतिबंधित तासांमध्ये शहरातील अंतर्गत रस्त्यांवरील अवजड वाहनांसह उल्लंघनांवर कठोरपणे लक्ष दिले गेले आहे. वाहतूक पोलिस विविध वाहतूक नियमांच्या उल्लंघनांविरुद्ध त्यांची कारवाई तीव्र करतील.




#### वाहतूक पोलीस कारवाई तीव्र करणार...

दुचाकींवर ट्रिपल सीट चालवणे, चुकीच्या बाजूने वाहन चालवणे आणि मोठ्या आवाजातील सायलेन्सर. संपूर्ण शहरातील वाहतूक विभागांना जागरूकता आणि अंमलबजावणीचे प्रयत्न दोन्ही वाढवण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. डीसीपी (वाहतूक) बापू बांगर म्हणाले, "घरातून बाहेर पडल्यानंतर, इच्छित स्थळी पोहोचेपर्यंत ड्रायव्हर प्रत्येक किलोमीटरमध्ये किमान पाच वेळा हॉर्न वाजवतो. त्यामुळे शहरातील ध्वनिप्रदूषण वाढत असून, वाहनचालकांचे मानसिक आरोग्यही बिघडत आहे. ही चालकांना विनंती आहे आणि असे मानले जाते की जर तुम्ही दिवसभर हॉर्न वाजवला नाही तर हळूहळू हॉर्न वाजवण्याची सवय कमी होईल.

---

# मावळात १५ ग्रामपंचायतींसाठी ७७.८४ टक्के मतदान

### » चार ग्रामपंचायती बिनविरोध : सरपंच पदाच्या 19 जागांसाठी 117 उमेदवारी अर्ज

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'मावळ तालुक्यातील 15 ग्रामपंचायतींसाठी रविवारी (दि. 5) मतदान पार पडले. यामध्ये 14 हजार 693 जणांनी मतदानाचा हक्क बजावला. तालुक्यात 77.84 टक्के मतदान झाले. मावळ तालुक्यातील 19 ग्रामपंचायतींची निवडणूक जाहीर झाली होती. त्यातील चार ग्रामपंचायतीची निवडणूक बिनविरोध झाली. तर दोन गावांमधील सरपंच पदांची बिनविरोध निवड झाली आहे.**




तालुक्यात 15 गावांमध्ये 46 मतदान केंद्रांवर मतदान झाले. 15 गावांमध्ये 9 हजार 334 पुरुष मतदार तर 9 हजार 540 पुरुष मतदार आहेत. दोन तृतीयपंथी मतदारांसह 15 गावांमध्ये 18 हजार 876 मतदार आहेत. रविवारी सकाळी साडेसात वाजता मतदानाला सुरुवात झाली. पहिल्या दोन तासात 24.60 टक्के मतदान झाले.

दुपारी साडेतीन वाजेपर्यंत हाती आलेल्या आकडेवारीनुसार सात हजार 294 महिला आणि सात हजार 394 पुरुष मतदारांनी मतदान केले. एकूण 77.84 टक्के मतदान झाले. 15 गावांमधील 151 जागांसाठी 217 जणांचे उमेदवारी अर्ज आले. ग्रामपंचायत निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत 20 ऑक्टोबर पर्यंत होती. त्यानंतर 23 ऑक्टोबर रोजी अर्जांची छाननी झाली. या छाननी मध्ये 13 जणांचा अर्ज बाद झाले. 25 ऑक्टोबर पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत होती. सरपंच पदाच्या 19 जागांसाठी 117 उमेदवारी अर्ज आले होते. त्यातील 49 जणांनी अर्ज माघारी घेतले असून आता 13 गावच्या सरपंच पदासाठी 68 जण रिंगणात होते.

#### भोरला 84 टक्के मतदान; शांततेत मतदान प्रक्रिया पूर्ण

भोर तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत ८३.५४ टक्के मतदान झाले असून मतदान प्रक्रीयेत कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. तालुक्यातील १४ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रीक आणि पोटनिवडणूकीतील १० हजार २५८ मतदारांपैकी ८ हजार ५७० मतदारांनी मतदान केले. महिलांनी पुरुषांच्या बरोबरीने मतदान केले आहे. महिलांच्या मतदानाची टक्केवारी ८२ तर पुरुषांच्या मतदानाची टक्केवारी ८४ आहे. ४ हजार ९३० महिला मतदारांपैकी ४ हजार ४८ महिलांनी मतदान केले.

तर ५ हजार ३२८ पुरुष मतदारांपैकी ४ हजार ५२२ जणांनी मतदान केले. सर्वाधिक ९०.८२ टक्के मतदान हे जयतपाड ग्रामपंचायतीमध्ये झाले आहे. त्याखालोखाल दापकेघर ग्रामपंचायतीमध्ये ८९ टक्के आणि हिर्डोशी, महुडे खुर्द आणि माळेगाव ग्रामपंचायतीमध्ये ८८ टक्के मतदान झाले आहे. तर सर्वात कमी ७२ टक्के मतदान हे शिरवली हिमा ग्रामपंचायतीमध्ये झालेले आहे.

#### निवडणुकीत रंगत...

» मावळ तालुक्यात 19 ग्रामपंचायतीपैकी बेबडओहोळ, आढले बुद्रुक, लोहगड आणि ओव्हाळे या चार ग्रामपंचायतींची पूर्ण निवडणूक बिनविरोध झाली. त्यामुळे या गावांमध्ये मतदान प्रक्रिया झाली नाही. तर शिरगाव आणि पुसाणे या गावांमध्ये सरपंच पदाची निवडणूक बिनविरोध झाली असल्याने या दोन गावांमध्ये सदस्य पदांची प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पार पडली. तालुक्यातील दिवड, मळवंडी ढोरे, भाजे, सांगिसे, कोंडीवडे, उदेवाडी, शिळिंब, मुंढावरे या ग्रामपंचायत निवडणुकीत तिरंगी लढत पहायला मिळाली.




**मुळात नोकऱ्याच नाहीयेत तर आरक्षित काय करणार? नवीन नोकऱ्या निर्माण व्हायला हव्यात. त्यासाठी सध्याच्या आर्थिक वाढीच्या प्रतिमानांचा पुन्हा नीट विचार करायला हवा. जरांगे पाटील यांनीही आंदोलनाची दिशा बदलायला हवी. दर्जेदार शिक्षण, आरोग्य, पैसा देणारी शेती, दर्जेदार रोजगार निर्माण करणारी आर्थिक प्रतिमाने यांचा आग्रह धरायला हवा. लेविस गुरुजींचा धडा नीट समजून घ्यायला हवा.**

# जरांगे पाटील आणि लेविस गुरुजींचा धडा!



एका कृष्णवर्णीय व्यक्तीला १९७९ साली अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक जाहीर झाले. डब्लू. आर्थर लेविस हे मूळचे कॅरिबिअन. विकासाच्या अर्थशास्त्रातील एका मूलभूत संकल्पनेसाठी त्यांना हे पारितोषिक मिळाले. ती संकल्पना म्हणजे द्वैत अर्थव्यवस्था. विकसनशील अर्थव्यवस्थेतून एकाच वेळेस दोन विभिन्न अर्थव्यवस्थांचे सह-अस्तित्व असते. एक व्यवस्था आधुनिक, भांडवलप्रधान, श्रमाची उत्पादकता भरपूर असलेली आणि म्हणून चांगले राहणीमान देणारी. दुसरी श्रमप्रधान, मोठ्या प्रमाणात छुपी बेरोजगारी असलेली, श्रमाची उत्पादकता खूप कमी असलेली आणि म्हणून कामगारांचे राहणीमान कमी दर्जाचे असलेली. लेविस यांच्या मते विकासाची प्रक्रिया म्हणजे श्रमाची उत्पादकता कमी असलेल्या अर्थव्यवस्थेतून कामगारांना बाहेर काढून जास्त उत्पादकता असलेल्या क्षेत्रात आणण्याची प्रक्रिया. आधुनिक क्षेत्रात भांडवली गुंतवणूक करून त्या क्षेत्रातील श्रमाची उत्पादकता आणि रोजगार संधी वाढवून परंपरागत क्षेत्रातील श्रमिकांना आधुनिक क्षेत्रात आणणे हा विकास प्रक्रियेतील खूप महत्त्वाचा टप्पा. अर्थात हे फक्त आधुनिक क्षेत्रातील गुंतवणूक वाढवून होणार नाही तर परंपरागत क्षेत्रातील कामगारांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर, म्हणजेच मानवी भांडवलावरसुद्धा गुंतवणूक करणे आवश्यक आहे हे मत नंतर अमर्त्य सेन यांच्यासकट बऱ्याच तज्ज्ञांनी मांडले. ज्या ज्या राष्ट्रांनी आपल्या मानवी संसाधनावर गुंतवणूक केली, उत्तम प्राथमिक आणि उच्च शिक्षण व्यवस्था, सर्वसामान्यांना उत्तम आरोग्य आणि त्याचबरोबर आधुनिक क्षेत्राचा विकास केला त्यांची प्रगती झाली.

चीन, जपान वगैरे देशांनी हेच केले. आपल्याकडे असलेल्या मानवी संसाधनाचा उत्तम विकास केला की आपण निर्मितीसाठी प्रामुख्याने मनुष्यबळ आवश्यक असणाऱ्या वस्तूंची जागतिक बाजारपेठ काबीज करू शकतो, आणि त्यातून आपल्या कामगारांना चांगले जीवनमान देऊ शकतो हे या राष्ट्रांनी दाखवून दिले. दुर्दैवाने भारतात हे झाले नाही. आपण स्वातंत्र्य मिळाल्यावर आयआयटी, आयआयएम वगैरे संस्था उभ्या केल्या, पण चांगल्या प्राथमिक शाळा निर्माण करणे राहून गेले. सर्वांना परवडेल अशी आरोग्य व्यवस्था निर्माण झाली नाही. त्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर भारतीय धोरण सोविएत प्रकारचे नव्हते. तत्कालीन कम्युनिस्ट राजवटीची आर्थिक धोरणे चुकली असतील, पण त्या सर्वांनी आपापल्या मनुष्यबळात जी मोठी गुंतवणूक केली ती आता त्यांना उपयोगी पडते आहे.

नावाला कम्युनिस्ट असलेल्या व्हिएतनामचे दरडोई उत्पन्न भारताच्या दीडपट असणे आणि त्या देशातील शाळा या जगातल्या सर्वोत्तम शाळांपैकी असणे हा योगायोग नाही. आपण सुरुवातीपासून हे केले नाही. नंतरच्या सगळ्याच सरकारांनी याकडे दुर्लक्ष करण्याचे धोरण सुरू ठेवले. एवढेच नाही तर आपण या व्यवस्थेतील नियामक व्यवस्थांचा जाणीवपूर्वक ऱ्हास केला. भारतात आता एकूणच सार्वजनिक संस्थांचे नियमन इतके रसातळाला गेलेले आहे की यापुढे सार्वजनिक शिक्षण आणि आरोग्य सुविधा सुधारणे खूपच कठीण आहे, असे बहुसंख्य अभ्यासकांचे मत आहे. याचा परिणाम असा झाला की, ग्रामीण परंपरागत, प्रामुख्याने कृषिप्रधान अर्थव्यवस्थेतून बाहेर पडून दर्जेदार रोजगार मिळवण्याची शक्यताच राहिली नाही. हे जसे भारतभर झाले तसेच महाराष्ट्रातही झाले. त्यात वाढीव अडचण म्हणजे शेतीच न परवडण्यासारखी झाली. एकीकडे शेतीचे तुकडीकरण झाले आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेने २०१९ साली भारतातील शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या परिस्थितीवर एक अहवाल प्रकाशित केला आहे. महाराष्ट्रातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त कुटुंबांकडे असलेली शेती ०.४ हेक्टरपेक्षा कमी आहे, तर २५ टक्के कुटुंबांची शेती नगण्य म्हणजे ०.००१ हेक्टरपेक्षाही कमी आहे.

## संपादकीय »

### राजकारण कशाला?

***भारतात सध्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. त्याचवेळी इस्रायल-पॅलेस्टिनी संघर्ष, पाकिस्तान-अफगाणिस्तान यांच्यातील राजकीय ताणाताणी सुरू आहे.***

यासारख्या घटनांचा खेळांवर परिणाम होणे स्वाभाविक आहे. परंतु खेळाडूंनी त्यावर प्रतिक्रिया देण्यासाठी मैदानाचाच वापर करणे गैर आहे. जागतिक स्थितीवर अन्य व्यासपीठांवरून मते मांडणे सयुक्तिक राहू शकते. पण खेळ हा खेळच राहिला पाहिजे, त्याला राजकीय मुलामा देण्याचा प्रयत्न कोणी करू नये. आयसीसी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेदरम्यान अशा काही घटना समोर येत आहेत की, त्या खेळ भावना आणि क्रीडा संस्कृतीला गालबोट लावत आहेत. कधी कधी खेळाडूंना चिडविण्यासाठी धार्मिक घोषणा दिल्या जातात. याकडे काही जण द्वेषभावनेतून उमटणारी प्रतिक्रिया म्हणत आहेत, तर काही जण राजकारण. या भानगडीत फारसे न पडणारी मंडळी या घटना क्रिकेटच्या अस्मितेला ठेच पोचविणाऱ्या आणि नकारात्मक वातावरण तयार करणाऱ्या आहेत, असे म्हणतील.

**आपल्याकडचे शिक्षण व्यवसायाभिमुख नाही. आपले सामाजिक, आर्थिक प्रश्न आणि शिक्षण यांची सांगड घातली जात नाही. कारण प्रश्नांचा त्या अंगाने अभ्यासच होत नाही. आपण रोजगाराभिमुख शिक्षणव्यवस्थाच निर्माण करत नाही तर, रोजगारनिर्मिती होणार तरी कशी? मराठा आरक्षण आंदोलनाने महाराष्ट्र ढवळून निघाला. अनेक अभ्यासकांनी या आंदोलनाचे विश्लेषण केले आणि त्यातून जी कारणे पुढे येत आहेत त्यात काहीच आश्चर्यकारक नाही.**

# आरक्षण नव्हे, बेरोजगारी हाच मूळ प्रश्न..!

शेतीची अवघड परिस्थिती आणि चांगल्या नोकऱ्यांची कमतरता ही ती कारणे. थोडक्यात, तरुण पिढीला कुठलेही आर्थिक स्थैर्य किंवा व्यावसायिक आणि सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होईल असे भविष्य दिसत नाहीये. शेतीतील समस्या जुनीच – वाढता खर्च, पाण्याचा प्रश्न आणि अनियमित वीजपुरवठा. त्या मागची कारणेही जुनीच – कृषी, सिंचन व वीजपुरवठा विभाग यांची ढासळती कार्यक्षमता आणि नियोजनाचा अभाव. मग यात बदल तरी कसा होणार?हीच परिस्थिती इतर क्षेत्रांमध्ये दिसून येते, मग ते ग्रामीण असो अथवा शहरी. पिण्याच्या पाण्याची अवस्था, शहरी वाहतूक, प्रदूषण, कुपोषण हे सगळे प्रश्न तसेच पडून आहेत. नुकतेच वाचले की नंदुरबार जिल्ह्यात कुपोषणावर उपाय करणे तर सोडाच, बाळाचे वजन मोजण्याचे यंत्रसुद्धा उपलब्ध नाही. सार्वजनिक सेवांची जी अवस्था आहे, तीच परिस्थिती



आहे आपल्या उद्योग व्यवसायांची. आज बहुतेक जिल्ह्यांमधील स्थानिक उद्योग अडचणीत आहेत. शेतीमालाचा व्यापार आधीच काही मोजक्या व्यापारी कुटुंबांच्या हातात होता.

आता याच लोकांचे बांधकाम व्यवसाय, मोठ्या कंपन्यांची डिलरशिप, शिक्षण अशा इतर क्षेत्रात वर्चस्व वाढत आहे. सुतारकाम, मिस्त्रीकाम, बेकरी, खाद्यपदार्थ निर्मिती हे छोटे पारंपरिक उद्योग व व्यवसाय जुनाट यंत्रसामग्रीच्या जाचात अडकले आहेत. मध्यम व उच्चवर्ग मॉल व मोठे उद्योग यांच्या उत्पादनांकडे वळला आहे. यामुळे चांगल्या नोकऱ्या आणि उद्योगधंदे कमी झाले आहेत आणि या नवीन व्यवस्थेत स्थानिक युवा पिढीला एजंट किंवा गडी असे अतिशय दुय्यम स्थान मिळत आहे.थोडक्यात, आजची राष्ट्रीय अर्थ व शासन प्रणाली तसेच समाजव्यवस्था, ही मोठ्या व्यापारी वर्गासाठी अमृत काळ असली तरी सामान्य लोकांसाठी अनिष्ट काळच आहे. त्यांचे स्थान हे लाभार्थी अथवा याचक असे बनले आहे. प्रथम, कुठलीही समस्या सोडवण्यासाठी पहिले पाऊल हे त्या समस्येबद्दल माहिती गोळा करून तिचे विश्लेषण करणे असे असते. शेती क्षेत्र बघितले तर आज गाव सोडाच, तालुका किंवा जिल्हा स्तरावर कुठलीही माहिती शासन गोळा करत नाही. अमुक गावात सोयाबीनचा सरासरी उतारा किती? कि त्याचप्रमाणे, गावात किती डीपी आहेत आणि कितींची गरज आहे? किती नादुरुस्त आहेत? किती टक्के शेतकऱ्यांना वीज उपलब्ध आहे या कुठल्याही प्रश्नाचे उत्तर आपल्याकडे नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# साताऱ्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचं पर्यटन स्थळ

## पर्यटन स्थळाचा 105 गावांना फायदा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**साताऱ्यातील मुनावळे (ता जावळी)येथे अत्याधुनिक व सर्व सोयींनी युक्त असे आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ विकसित करण्यात येत आहे. या माध्यमातून १०५ गावातील स्थानिकांना रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.**



मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी मुनावळे पर्यटन स्थळाच्या जागेची पाहणी केली व ग्रामस्थांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी, पुर्षोत्तम जाधव यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या परिसरात पर्यटनाच्या मोठ्या संधी आहेत. त्यामुळे कांदाटी खोऱ्यातील आणखी पर्यटन प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्यातून स्थानिकांना त्यांच्या घरा जवळ रोजगार मिळणार आहे. याचा फायदा स्थानिक व येणारे पर्यटकांनाही होणार आहे. मुख्यमंत्री श्री शिंदे पुढे म्हणाले, मुनावळे येथे स्कुबा डायव्हिंग, बनाना राईड, जेट स्की, हाऊस बोट, बोट क्लब यासह पर्यटकांसाठी अत्याधुनिक सुविधा उभारण्यात येत आहेत.

तसेच यामध्ये सुरक्षेचा विचार करण्यात आला आहे. त्यासाठी निरीक्षण मनोरा, पर्यटकांसाठी चेंजिंग रूम या सोयी ही असणार आहेत. ग्रामस्थांसाठी परवानगी देण्यात यावी, जलाशयामध्ये मत्स्यबीज सोडावे. अतिरिक्त भू संपादन झालेल्या जमिनींचा प्रश्न जिल्हाधिकारी यांनी विशेष शिबिर घेऊन मार्गी लावावा, अशा सूचना त्यांनी केल्या. बैठकीमध्ये जिल्हाधिकारी श्री डुडी यांनी प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. यापूर्वी मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी हेलिकॉप्टर मधून वासोटा किल्ला, नागेश्वर मंदिर, अहिरे पुल, बामणोली परिसराची हवाई पाहणी केली. स्थानिकांना रोजगार मिळाला पाहिजे असे सांगून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, स्थानिकांनी देखील सुरू होत असलेल्या या पर्यटन स्थळाचा आर्थिक उन्नतीसाठी वापर करावा. हे पर्यटन स्थळ विकसित करताना स्थानिकांना त्या मध्ये सामावून घ्यावे. या परिसरात पर्यटनाच्या मोठ्या संधी आहेत.

### जलाशयामध्ये मत्स्यबीज सोडावे

मासेमारीसाठी परवानगी देण्यात यावी, जलाशयामध्ये मत्स्यबीज सोडावे. अतिरिक्त भू संपादन झालेल्या जमिनींचा प्रश्न जिल्हाधिकारी यांनी विशेष शिबिर घेऊन मार्गी लावावा, अशा सूचना त्यांनी केल्या. त्यातून स्थानिकांना त्यांच्या घरा जवळ रोजगार मिळणार आहे. याचा फायदा स्थानिक व येणारे पर्यटक यांनाही होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. बैठकीमध्ये जिल्हाधिकारी श्री डुडी यांनी प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. यापूर्वी मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी हेलिकॉप्टर मधून वासोटा किल्ला, नागेश्वर मंदिर, अहिरे पुल, बामणोली परिसराची हवाई पाहणी केली.

# समाजकार्य अभ्यासांतर्गत विविध स्पर्धा, उपक्रम!

## माजी नगरसेवक कोराणे यांच्याहस्ते पारितोषिक वितरण

। कोल्हापूर।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पीबी साळुंखे कन्या विद्यामंदिर क्र 47 या महापालिकेच्या शाळेमध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट अधिविभागाच्या समाजकार्य अभ्यासक्रमाअंतर्गत हे उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये व्यक्ती सहयोग कार्य ए गटकार्य या समाजकार्याच्या पद्धतींसोबत विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला पूरक उपक्रम 10 ऑगस्ट ते 3 नोव्हेंबर 2023 या कालावधीमध्ये हे उपक्रम राबविण्यात आले.**



समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनी स्वाती राऊत, शाहीन पाटील आणि प्रीती कांबळे यांनी पीबी साळुंखे कन्या विद्यामंदिर येथे क्षेत्रकार्य करताना विविध स्पर्धा राबविण्यासाठी पुढाकार घेतला. यामध्ये चित्रकला स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, स्मरणशक्ती स्पर्धा, दहीहंडी उत्सव, रक्षाबंधन, वृक्षारोपण, संगणक शिक्षण आदी स्पर्धा घेतल्या.

यासह समुदाय भेट, अंगणवाडी भेट, नगरसेवकांची भेट, आशा सेविका भेट, शिक्षण प्रकल्पाधिकारी, फिरंगाई हॉस्पिटल व माजी नगरसेवक उत्तम कोराणे यांची भेट घेतली. या वेळी विविध समस्या आणि उपाययोजना याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

माजी नगरसेवक कोराणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण करून क्षेत्रकार्याचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमासाठी क्षेत्रकार्य मार्गदर्शिका सहायक प्राध्यापिका डॉ. उर्मिला दशवंत या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. पीबी साळुंखे कन्या विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका गीता काळे कार्यक्रमाच्या अध्यक्ष होत्या. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी समाजकार्य विद्यार्थिनी, शाळेतील शिक्षक, कर्मचारी आणि शाळा व्यवस्थापन समिती, पालक उपस्थित होते.

## २०२४ लोकसभा निवडणुक :

# भाजपचा खास प्लॅन!

। मुंबई ।महाईन्यूज । प्रतिनिधी।



भाजपने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी 'महाविजय २०२४' ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेंतर्गत पक्षाने आपली रणनीतीही आखली आहे. त्यानुसार राज्यभरात वॉर रूमचे जाळे तयार केले जाणार आहे. या वॉर रूमच्या माध्यमातून विधानसभेच्या २८८ आणि राज्यातील लोकसभेच्या सर्व ४८ मतदारसंघांवर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे.

वॉर रूमच्या माध्यमातून केंद्रातील मोदी सरकार आणि राज्य सरकारची कामे लोकांपर्यंत कशी पोहोचतील याची खातरजमा भाजप करणार आहे. याशिवाय भाजप वॉर रूमच्या माध्यमातून प्रत्येक मतदारसंघ आणि तेथील उमेदवारांवर लक्ष ठेवणार आहे; तसेच प्रत्येक मतदारसंघातील समस्या आणि विषयांची माहितीही या माध्यमातून घेणार आहे. भाजप आमदार श्रीकांत भारतीय यांनी या वॉर रूमबाबत सविस्तर प्रतिक्रिया दिली. 'भाजप ३६५ दिवस निवडणुकीची तयारी करणारा पक्ष आहे. भाजपने २०१४पासून निवडणूक व्यवस्थापनामध्ये एक वैशिष्ट्य तयार केले आहे. त्यामुळे २८८ विधानसभा मतदारसंघांत २८८ वॉर रूम तयार करीत आहोत. भाजप २८८ विधानसभा आणि ४८ लोकसभा मतदारसंघांत तयारी करत आहे. ही तयारी महायुतीसाठी आहे,' असेही भारतीय यांनी स्पष्ट केले. 'एखादा मतदारसंघ महायुतीतील मित्रपक्षाकडे असेल, तर ती जागाही निवडून आणण्याची जबाबदारी भाजपची आहे. त्यादृष्टीने आम्ही या वॉर रूम तयार करत आहोत. या वॉर रूममध्ये तीन प्रकारच्या जबाबदाऱ्या देण्यात येणार आहेत. त्या म्हणजे, टेक्नॉलॉजीचा वापर करणे, अधिक गतिमान पद्धतीने निवडणूक व्यवस्थापन करणे आणि केंद्र व राज्यातील योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे. प्रत्येकी एक कमांड सेंटर तयार केले आहे.

# 22 बेटींग ऑनलाइन ॲपवर बंदी!

## मी कुणाला किती, कुणाला आणि कधी पैसे दिलेत : भूपेश बघेल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्र सरकारने ऑनलाइन बेटिंग ॲपबाबत (MAHADEV BETTING APP) मोठा निर्णय घेतला आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने महादेव बुक आणि रेड्डीअण्णा प्रेस्टोप्रोसह २२ बेकायदेशीर बेटिंग ॲप्स आणि वेबसाइट्स ब्लॉक करण्याचे आदेश आज (दि. ५) देण्यात आले आहेत. बेकायदेशीर सट्टेबाजी ॲप सिंडिकेट आणि त्यानंतर छत्तीसगडमधील महादेव बुक ॲपवर टाकलेल्या छाप्यामध्ये अंमलबजावणी संचालनालय (ईडी) च्या तपासानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. या कारवाईनंतर ॲपचे बेकायदेशीर प्रकरण उघडकीस आले आहे.**

माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी छत्तीसगड सरकारवर टीका केली आहे. राजीव चंद्रशेखर म्हणाले, “छत्तीसगड सरकारला कलम ६९ अ कायद्याअंतर्गत ॲप आणि संकेतस्थळे बंद करण्याची विनंती करण्याचा अधिकार होता. पण, सरकारकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. गेली दीड वर्षे छत्तीसगड सरकार यासंबंधी चौकशी करत आहे. पण, ईडीनं केलेल्या विनंतीनंतर संबंधित ॲपवर कारवाई करण्यात आली आहे.” ‘महादेव’ या ऑनलाइन बेटिंग ॲपच्या प्रवर्तकांनी छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांना आतापर्यंत ५०८ कोटी रुपये दिल्याचा दावा सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) शुक्रवारी ( ३ नोव्हेंबर ) केला. तसेच हे प्रकरण चौकशीच्या कक्षेत येत असल्याचे सांगितले. ‘महादेव’ बेटिंग ॲपप्रकरणी ईडीनं फरार घोषित केलेल्या शुभम सोनीनं दुबईतून व्हिडीओ प्रसारित केला आहे. व्हिडीओच्या माध्यमातून शुभम सोनीनं मुख्यमंत्री भूपेश




बघेल यांच्यावर गंभीर आरोप केलेत. तसेच, ‘महादेव’ बेटिंग ॲपचा मालक असल्याचंही शुभम सोनीनं सागितलं. “मुख्यमंत्र्यांनी बुकीचं काम वाढवण्याच्या सूचना दिल्या आणि दुबईला जाण्यास सांगितलं,” असं शुभम सोनीनं म्हटलं आहे.

‘महादेव’ या ऑनलाइन बेटिंग ॲपच्या प्रवर्तकांनी छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांना आतापर्यंत ५०८ कोटी रुपये दिल्याचा दावा सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) शुक्रवारी ( ३ नोव्हेंबर ) केला. तसेच हे प्रकरण चौकशीच्या कक्षेत येत असल्याचे सांगितले. यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपाच्या नेत्यांनी मुख्यमंत्री बघेल यांना लक्ष्य केलं आहे. अशातच ‘महादेव’ बेटिंग ॲप प्रकरणातील आरोपी शुभम सोनीनं मुख्यमंत्री बघेल यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मनी लॉड्रिंग प्रकरणात ईडीनं शुभम सोनीला फरार घोषित केलं आहे. शुभम सोनीच्या सांगण्यावरून अटकेत असलेला असीम दास हा कथितरित्या भूपेश बघेल यांना पैसे पोहचवत असे. आता शुभम सोनीनं दुबईतून एक व्हिडीओ प्रसारित केला आहे. त्यात बघेल यांच्या सांगण्यावरूनच दुबईला गेल्याचं सोनीनं म्हटलं आहे. यामुळे एकच खळबळ उडाली आहे. मी भिलाई येथे बुकी चालू केली होती. त्यातून चांगला पैसा मिळत होता. बुकी चालू केल्याचं समोर आल्यानंतर माझ्या येथे काम करणाऱ्या मुलांना पकडण्यात आलं. नंतर मी वर्मांच्या संपर्कात आलो. वर्मांना संरक्षणासाठी मी महिन्याकाठी १० लाख रूपये द्यायचो. “नंतरही माझ्या मुलांना पकडले गेले. तेव्हा वर्मांनी माझी मुख्यमंत्र्यांबरोबर भेट घालून दिली. तिथे बिट्टू आणि मुख्यमंत्र्यांनी काम वाढवण्याच्या सूचना दिल्या आणि दुबईला जाण्यास सांगितलं. माझे काम चांगलं चालू होतं. पण, नंतर माझी मुले पकडली गेली. मी रायपूरला आलो, त्यानंतर वर्मा आणि गिरीश तिवारीच्या मार्फत तत्कालीन पोलीस अधिक्षक प्रशांत अग्रवलांना भेटलो,” असं सोनीनं सांगितलं.

### छत्तीसगडमध्ये कारवाईची अपेक्षा

» मंत्री राजीव चंद्रशेखर (कौशल्य विकास, उद्योजकता आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान) यांनी याबाबत माहिती देत असताना छत्तीसगड सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले, “छत्तीसगड सरकारला माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम 69A अंतर्गत कोणतीही वेबसाइट/ॲप बंद करण्याची शिफारस करण्याचा पूर्ण अधिकार आहे, परंतु त्यांनी तसे केले नाही आणि उलट अशा ॲप सुरूच ठेवल्या होत्या. गेल्या दीड वर्षात राज्य सरकारकडून चौकशीबाबतची माहिती किंवा एकही विनंती करण्यात आलेली नाही. छत्तीसगड सरकारने याबाबत कारवाई अथवा चौकशी करण्याविषयीचे पाऊल उचलणे अपेक्षित होते, परंतु याबाबत पहिली विनंती फक्त ईडीकडून प्राप्त झाली आहे.” अशी माहिती मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी दिली.

# देशातील सर्वात दानशूर महिला!

## वर्षभरात दिली तब्बल 170 कोटींची देणगी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जगात बिल गेट्सपासून वॉरन बफेपर्यंत अनेक अब्जाधीश आहेत. हे लोक दरवर्षी मोठ्या प्रमाणात देणगी देतात. भारतातही देणगीदारांची कमतरता नाही, इथेही श्रीमंत धनदांडगेही देणगी देण्यात मागे नाहीत. एचसीएलचे प्रमुख शिव नाडर, विप्रोचे संस्थापक अझीम प्रेमजी ते रिलायन्सचे अध्यक्ष मुकेश अंबानी आणि अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांसारखी मोठी नावे यात सामील आहेत.**



जे आपली कमाई शिक्षण, आरोग्य यासह अनेक क्षेत्रात खुलेपणाने दान करतात. पण तुम्हाला माहिती आहे का भारतातील सर्वात मोठी देणगी देणारी महिला कोण आहे? चला तर जाणून घेऊयात त्या दाणशूर व्यक्तीबद्दल माहिती. रोहिणी नीलेकणी ही सर्वात मोठी दानशूर महिला आहे. गुरुवारी जाहीर झालेल्या एडलगिव्ह हुरुन इंडिया फिलान्थ्रॉपी लिस्टनुसार, 2022-23 या आर्थिक वर्षात सर्वाधिक देणगी देणारी भारतीय महिला म्हणजे रोहिणी नीलेकणी. जी इन्फोसिसचे सह-संस्थापक नंदन नीलेकणी यांच्या पत्नी आहेत. आपल्या पतीप्रमाणेच रोहिणी देखील सामाजिक कार्यात परोपकारी कार्यात आघाडीवर आहेत. त्यांनी इतर देणगी देणाऱ्या महिलांना मागे टाकत सर्वात मोठ्या दानशूर महिलेचा किताब पटकावला आहे. EDELGIVE HURUN INDIA PHILANTHROPY LIST 2023 मध्ये प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार, रोहिणी नीलेकणी यांनी मोठी रक्कम दान केली आहे. रोहिणी नीलेकणी यांनी वर्षभरात 170 कोटी रुपयांची देणगी दिली आहे. हुरुनच्या अलीकडील भारतीय देणगीदारांच्या यादीत समाविष्ट असलेल्या महिलांबद्दल बोलायचे तर रोहिणी नीलेकणी पहिल्या क्रमांकावर आहेत. त्यांनी 170 कोटी रुपयांची मोठी देणगी दिली आहे. एवढ्या मोठ्या रकमेची देणगी देऊन एकीकडे रोहिणी महिला रक्तदात्यांच्या यादीत पहिल्या क्रमांकावर असतानाच दुसरीकडे तिला देशातील 10 श्रीमंत देणगीदारांच्या यादीतही स्थान मिळाले आहे. रोहिणी व्यतिरिक्त, उदारपणे देणगी देणाऱ्या महिलांमध्ये अनु आगा आणि थरमॅक्सचे कुटुंब (रु. 23 कोटी), USV च्या लीना गांधी तिवारी (रु. 23 कोटी) यांचा समावेश आहे. बिझनेस स्टँडर्डच्या अहवालानुसार, EDELGIVE HURUN INDIA PHILANTHROPY LIST 2023 नुसार, शिव नाडर 2042 कोटी रुपयांची देणगी देऊन देशातील सर्वात परोपकारी बनले आहेत.

# बिहारच्या जात सर्वेक्षणात मुस्लिम, लोकसंख्या वाढवली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

बिहारमधील जात सर्वेक्षण ( BIHAR CASTE SURVEY ) हा राजकारणाच्या तुष्टीकरणाचा प्रकार आहे. या जात सर्वेक्षणात राज्यातील मुस्लिम आणि यादव लोकसंख्या वाढवली आहे, असा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शहा ( AMIT SHAH ) यांनी केला. मुझफ्फरपूर जिल्ह्यात आज (दि.५) एका सभेमध्ये ते बोलत होते. राज्यात जात सर्वेक्षण करण्याचा निर्णय नितीश कुमार यांचा जेडी(यू) एनडीएचा घटक असताना घेण्यात आला होता, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

अमित शहा म्हणाले की, बिहारमधील जनता दल संयुक्त ( जेडी(यू) आणि राष्ट्रीय जनता दल (आरजेडी) आघाडीचे सरकार आहे. यांचा एकमेव अजेंडा पंतप्रधान नरेंद्र मोदींना विरोध करणे आहे. आता तरी नितीश कुमार यांनी पंतप्रधान होण्याचे स्वप्न पाहणे थांबवावे. भारत आघाडीने त्यांना आपले निमंत्रकही बनवले नाही, असा टोलाही त्यांनी लगावला. राज्यातील ‘गुंडाराज’साठी जेडी(यू) नेते जबाबदार आहेत, असा आरोप करत अमित शहा यांनी बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्यावर हल्लाबोल केला. आरजेडी आणि जेडीयू जम्मू-काश्मीरमधून कलम 370 हटवण्याच्या समर्थनात नव्हते. कलम 370 हटवलं तर रक्ताच्या नद्या वाहतील असं लालूप्रसाद यादव म्हणाले होते. लालूजी, रक्ताच्या नद्या सोडा, खडे टाकण्याचे धाडस कोणातच नव्हते, असेही त्यांनी सुनावले. नितीश कुमार आणि लालू यादव आपल्या कुटुंबाची दुकाने चालवत आहेत, एकाला पंतप्रधान व्हायचे आहे आणि दुसऱ्याला आपल्या मुलाला मुख्यमंत्री बनवायचे आहे. मात्र नितीश कुमारांना इंडिया आघाडीच्या संयोजकही बनवले नाही.

# बॉलीवूडमध्ये त्याच्या तोडीचा कुणी नाहीच!



साऊथचा प्रसिद्ध अभिनेता महेश बाबू हा त्याच्या एका चित्रपटाच्या टीझरमुळे चर्चेत आल्याचे दिसून आले आहे. गुंटूर करम नावाच्या चित्रपटामध्ये तो झळकणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याचा टीझर काही दिवसांपूर्वी व्हायरल झाला होता. त्याला चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. आता महेश बाबूच्या गुंटूर करम मधील दम मसाला नावाचे गाणे समोर आले आहे. त्याचा टीझर व्हायरल झाला असून त्यानं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. यापूर्वी महेश बाबूनं त्याच्या एका मुलाखतीमध्ये आपण कधीही बॉलीवूडमध्ये काम करणार नसल्याचे सांगितले होते. त्याचे कारण आपले मानधन बॉलीवूडला परवडणारे नाही. असे म्हटले होते. त्यावरुन मोठा वाद झाला होता. साऊथमध्ये महेशच्या नावाचा चाहतावर्ग मोठा आहे. त्याची लोकप्रियता मोठी आहे. अशावेळी महेश बाबूचा कोणताही चित्रपट येण्याचा अवकाश चाहत्यांचा त्याला मिळणारा प्रतिसाद मोठा असल्याचे दिसून आले आहे. आता त्याच्या नव्या गाण्याला चाहत्यांनी डोक्यावर घेतले आहे. यावेळी त्यावर आलेल्या प्रतिक्रियाही भन्नाट आहे. नेटकऱ्यांनी म्हटले आहे की, बॉलीवूडमध्ये तुझ्या तोडीचा अभिनेता नाहीच. त्रिविक्रम श्रीनिवास यांनी गुंटूर करमचे दिग्दर्शन केले असून तो १३ जानेवारी २०२४ रोजी प्रदर्शित होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यात महेश बाबू बरोबरच श्रीलिला, मीनाक्षी चौधरी, जगपति बाबू, राम्या कृष्णन, जयराम, प्रकाशराज आणि सुनील यांच्या भूमिका आहेत. यापूर्वी महेशनं त्याचे दिवंगत वडील अभिनेता कृष्णा यांच्या जयंतीच्या निमित्तानं गुंटूर करमचे गाणे आणि टीझर व्हायरल केला होता. त्या टीझरमध्ये महेश बाबू स्मोकिंग करताना दाखवण्यात आला होता.

# विराटच्या वाढदिवसानिमित्त अनुष्काची पोस्ट!

आज टीम इंडियाचा धडाकेबाज फलंदाज विराट कोहलीचा (VIRAT KOHLI) वाढदिवस आहे. किंग कोहलीला सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहते वाढदिवसाच्या शुभेच्छा देत आहेत. विराटची पत्नी अनुष्का शर्मानं (ANUSHKA SHARMA) देखील सोशल मीडियावर एक खास पोस्ट शेअर करुन विराटला शुभेच्छा दिल्या आहेत. अनुष्कानं विराटचे काही फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केले आहेत. त्यामधील एका फोटोमध्ये विराटच्या एका विक्रमाचा उल्लेख करण्यात आला आहे. "टी-20 क्रिकेट मॅचमध्ये 0 चेंडूमध्ये विकेट घेणारा विराट कोहली एकमेव क्रिकेटर आहे.", असं त्या फोटोवर लिहिलं आहे. अनुष्कानं विराटचे फोटो सोशल मीडियावर शेअर करुन कॅप्शनमध्ये लिहिलं, "तो त्याच्या आयुष्यातील प्रत्येक भूमिकेत अक्षरशः EXCEPTIONAL आहे! तो त्याच्या शिरपेचात आणखी काही मनाचे तुरे खोवत आहे. मी तुझ्यावर सदैव असेच प्रेम करत राहिन." अनुष्कानं शेअर केलेल्या या पोस्टवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. 2017 मध्ये अनुष्कानं विराट कोहलीसोबत लग्नगाठ बांधली. जानेवारी 2021 मध्ये अनुष्कानं मुलीला जन्म दिला. तिचे नाव वामिका असं आहे. विराट आणि अनुष्का हे एकमेकांसोबतचे रोमँटिक फोटो शेअर करत असतात. तसेच ते वामिकासोबतचे फोटो देखील शेअर करतात. विराट कोहली आणि अभिनेत्री अनुष्का शर्मा ही जोडी गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. विराट आणि अनुष्का हे दुसऱ्यांदा आई-बाबा होणार आहे, असं म्हटलं जात आहे. अनुष्का ही दुसऱ्यांदा प्रेग्नंट आहे, अशी चर्चा सध्या सोशल मीडियावर सुरु होती. काही दिवसांपूर्वी अनुष्का आणि विराट यांना मॅटर्निटी क्लिनिकच्या बाहेर पापाराझींनी स्पॉट केले होते, पण दोघांनीही पापाराझींना फोटो लीक न करण्याची विनंती केली होती. याच कारणामुळे आता विराट आणि अनुष्का यांच्या घरी एका चिमुकल्या पाहुण्याचे आगमन होणार आहे, अशी चर्चा सोशल मीडियावर होऊ लागली.



# दीपिका पदुकोणसोबत काम करण्याची इच्छा

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्रा (RAJ KUNDRA) हा गेल्या काही दिवसांपासून त्याच्या यूटी 69 या चित्रपटामुळे सध्या चर्चेत आहे. हा चित्रपट शुक्रवारी (3 नोव्हेंबर) प्रेक्षकांच्या भेटीस आला. चित्रपटानं ओपनिंग-डेला 10 लाख रुपयांची कमाई केली. आता यूटी 69 हा चित्रपट वीकेंडला जास्त कमाई करेल, असा अंदाज लावला जात आहे. यूटी 69 या चित्रपटानंतर आता राज कुंद्राला बॉलिवूडमधील एका प्रसिद्ध अभिनेत्रीसोबत काम करायचं आहे. राज कुंद्राने सांगितले की, त्याला आता बॉलिवूडमधील हिरोईनसोबत चित्रपट करायचा आहे. एका चॅट शोमधील 'रॅपिड फायर सेगमेंट' दरम्यान, राज कुंद्राने दीपिका पदुकोणसोबत (DEEPIKA PADUKONE) काम करण्याची इच्छा व्यक्त केली. दीपिका पदुकोणसोबत काम करायला आवडेल असं राज कुंद्रा सांगतो. ती मला खूप आवडते, असंही राजनं सांगितलं. पॉर्न फिल्म प्रकरणी राज कुंद्रा खटला चालू होता. तेव्हा त्याचा कैदी क्र. 69 होते. म्हणूनच या चित्रपटाचे नाव UT 69 असे ठेवण्यात आले आहे. पॉर्नोग्राफी प्रकरणात राज कुंद्राला जुलै 2021 मध्ये अटक करण्यात आली होती. जवळपास दोन महिने राज अटकेत होता. त्यानंतर त्याला सप्टेंबर 2021 मध्ये जामीन मिळाला. पोर्नोग्राफी प्रकरणी राज कुंद्राला पोलिसांनी ताब्यात घेतले होते. तेव्हा तुरुंगात फक्त 3-4 दिवस राहावे लागेल असं राजला वाटलं होतं. पण त्याला तब्बल 63 दिवस तुरुंगात राहावे लागले.

# नागराजची 'मटका किंग'वर वेबसिरीज

नागराज मंजुळे हे मराठी मनोरंजन विश्वातले आघाडीचे दिग्दर्शक. नागराज मंजुळे यांनी झुंडच्या माध्यमातुन हिंदी सिनेसृष्टीला सुद्धा स्वतःची दखल घ्यायला भाग पाडलं. नागराज लवकरच नाळ 2 च्या माध्यमातुन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. यानिमित्ताने लल्लनटापला दिलेल्या मुलाखतीत नागराज मंजुळे यांनी आगामी प्रोजेक्ट्सची माहिती सांगितली. नागराज आता लवकरच मटका किंगवर सिनेमा बनवणार आहेत. नागराज मंजुळे आता "मटका किंग" नावाच्या सट्टेबाजीवरील आगामी सिरीजसाठी निर्माता सिद्धार्थ रॉय कपूरसोबत हातमिळवणी करणार आहेत. 1960 आणि 90 च्या दशकात घडणारी गोष्ट या वेबसिरीजच्या माध्यमातुन दाखवली जाणार आहे. ही जुगाराचे संस्थापक आणि 'मटका किंग' म्हणून ओळखले जाणारे रतन खत्री यांच्या जीवनावर असणार आहे.



# रणदीप लवकरच चढणार बोहल्यावर!

बॉलिवूडमध्ये अनेक प्रतिभावान अभिनेते आहे ज्यांनी आपल्या अभिनयाने चाहत्यांच्या मनात घर केलं आहे. असाच एक अतिशय प्रतिभावान अभिनेता म्हणजे रणदीप हुड्डा. रणदीपने आपल्या दमादार अभिनयाने चाहत्यांची मने जिंकली आहेत. रणदीपच्या व्यावसायिक आयुष्याबद्दल तर सर्वांनाच माहिती आहे, परंतु आज रणदीप हा त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. रणदीप बऱ्याच काळापासून लिन




लैशरामला डेट करत आहे. रणदीप - लिन यांनी त्यांचे नातेही जाहीर करत चाहत्यांना ही गोड बातमी दिली होती. मात्र आता रणदीप हुड्डा याची प्रियकर लिन लैशरामसोबत लवकरच लग्न बंधनात अडकणार आहे. रणदीप आणि लिन लवकरच विवाहबंधनात अडकणार आहेत. हे कपल नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस लग्न करणार आहे. मात्र त्यांचे लग्न मुंबईत होणार नाही. रणदीप आणि लिन हे फक्त जवळचे मित्र आणि कुटुंबीयांच्या उपस्थितीत लग्न करणार आहेत. मात्र रणदीपने सध्या त्याच्या लग्नाबद्दल कोणालाही काहीही सांगू इच्छित नसल्याचे बोलले जात आहे.

# भारताची विजयी घौडदौड सुरूच!

## टीम इंडियाच्या गोलंदाजीपुढे द.आफ्रिकेने टेकले गुडघे

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**भारतात सुरु असलेल्या आयसीसी वनडे वर्ल्डकप स्पर्धेत टीम इंडियाची वाटचाल स्वप्नवत सुरु असून त्यांनी रविवारी दक्षिण आफ्रिकेवर तब्बल 243 धावांनी विजय मिळवला. कोलकाताच्या ऐतिहासिक ईडन गार्डन्सवर 65 हजार प्रेक्षकांच्या साक्षीने विराट कोहलीने आपला आयकॉन सचिन तेंडुलकरच्या 49 वनडे शतकांची बरोबरी केली. विराटचे शतक आणि श्रेयस अय्यरचे (77) अर्धशतक याच्या जोरावर भारताने दक्षिण आफ्रिकेला 327 धावांचे टार्गेट दिले.**

विजयासाठी मैदानात उतरलेल्या दक्षिण आफ्रिकन संघाला भारतीय गोलंदाजांनी गुडघे टेकायला लावले. स्पर्धेत धावांचा पाउस पाडणाऱ्या दक्षिण आफ्रिकेचा त्यांनी 27.1 षटकांत 83 धावांत खुर्दा केला. भारताच्या रवींद्र जडेजाने त्यांच्या 5 विकेटस घेतल्या. भारताचा हा सलग आठवा विजय आहे. या 243 धावांच्या विजयाने भारत आता अनस्टॉपेबल बनला असल्याचा संदेश विरोधकांना मिळाला आहे. (SA VS IND) भारतीय गोलंदाजांसमोर कोणत्याही फलंदाजाचा निभाव लागणे तसे अवघडच आहे. पण, आफ्रिकेच्या फलंदाजांनी यंदा प्रतिस्पर्धींना चांगला चोप दिला आहे. त्यामुळे चुरस अपेक्षित होती. मोहम्मद सिराजने दुसऱ्याच षटकात क्विंटन डी कॉकला (5) त्रिफळाचीत केले. रवींद्र जडेजाने 9व्या षटकात टेम्बा बवुमाचा (11) त्रिफळा उडवला आणि हेनरिच क्लासेनला (1) पायचीत पकडले. मोहम्मद शमीनेही दोन धक्के दिले. त्याने एडन मार्कराम ( 9) व रॅसी व्हॅन डेर ड्युसेनला (13) बाद करून आफ्रिकेचा निम्मा संघ 40 धावांत तंबूत पाठवले. डेव्हिड मिलर (11) चांगला खेळत होता, परंतु स्वीप मारण्याच्या प्रयत्नात जडेजाने त्याचा त्रिफळा उडवला. जडेजाने अप्रतिम चेंडूवर केशव महाराजचा (7) त्रिफळा उडवला




आणि आफ्रिकेला 67 धावांवर सातवा धक्का बसला. कुलदीप यादवने आफ्रिकेची अखेरची आशा असलेल्या मार्को यानसेनला (14) बाद करून आठवा धक्का दिला. भारताने आफ्रिकेचा संपूर्ण संघ 27.1 षटकांत 83 धावांवर माघारी पाठवला आणि 243 धावांनी सामना जिंकला. (SA VS IND) जडेजाने 9-1-33-5 असा स्पेल टाकला. युवराज सिंगनंतर वर्ल्ड कपमध्ये सामन्यात 5 विकेट्स घेणारा जड्डू दुसरा भारतीय फिरकीपटू ठरला. तत्पूर्वी, रनमशिन विराट, चेसमास्टर विराट, किंग कोहली, बाहुबली कोहली याने आपल्या 35 व्या वाढदिनी ऐतिहासिक ईडन गार्डन मैदानावर 49 वे शतक झळकावले. आपला 35 वा वाढदिवस साजरा करणाऱ्या बर्थडे बॉय विराटनेही फॅन्सना रिटर्न गिफ्ट दिले. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या विक्रमाची बरोबरी करणाऱ्या या शतकाच्या जोरावर भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध 5 बाद 326 धावा केल्या. विराट 101 धावांवर नाबाद राहिला. श्रेयस अय्यरने 77 तर रवींद्र जडेजाने नाबाद 29 धावा केल्या.

विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील आपल्या आठव्या विजयाच्या शोधात असलेल्या भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने कोलकाताच्या ईडन गार्डनवर नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतीय सलामीवीर शुभमन गिल आणि रोहित शर्मा यांनी स्फोटक सुरुवात केली, पण भारतीय कर्णधार रोहित शर्मा (40) बाद होताच धावगतीला ब्रेक लागला. सावध खेळी करत असलेल्या शुभमन गिल (23) ला केशव महाराजने आपल्या जाळ्यात फसवले. पण, त्यानंतर सुरू झाला तो 'द विराट शो'. त्याने श्रेयस अय्यरसोबत डाव पुढे नेला. केशव महाराज आणि तबरेज शम्सी यांचा स्पेल खेळून काढल्यानंतर श्रेयसने आपले हात सैल सोडले. विराट विकेट टिकवून खेळत होता, तर श्रेयस धोका पत्करून फटकेबाजी करीत होता. त्यामुळे आटलेला धावांचा ओघ पुन्हा सुरू झाला. अय्यरने 87 चेंडूत 77 धावांची अप्रतिम खेळी करून भारताची धावसंख्या 300 पार पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, पण लुंगी एन्गिडीने त्याला बाद केले अन् भारताला तिसरा झटका बसला. त्यानंतर लोकेश राहुल (8) आणि सूर्यकुमार यादव (22) यांनी विराटला साथ देण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना फार काळ खेळपट्टीवर टिकता आले नाही.

### भारताची आक्रमक सुरुवात

भारताची सुरुवात खूपच आक्रमक झाली. कर्णधार रोहित शर्मा आणि शुबमन गिलने आफ्रिकेच्या गोलंदाजांवर धावा बोलत पॉवर प्लेमध्ये सर्वाधिक ९० धावा केल्या. मात्र मोठा फटका मारण्याच्या नादात रोहित ४० धावा करून बाद झाला. रोहित शर्माने शुबमन गिलसह ३५ चेंडूत ६२ धावांची भागीदारी केली. रोहित २४ चेंडूत ४० धावा करून बाद झाला. त्याने आपल्या खेळीत सहा चौकार आणि दोन षटकार मारले भारताने दक्षिण आफ्रिकेचा २४३ धावांनी पराभव केला आहे. यासह टीम इंडियाचा अजिंक्य राहण्याचा ट्रेंड कायम आहे. सलग आठ विजयांसह भारताने गुणतालिकेत अव्वल स्थान कायम राखले असून आता भारत अव्वल स्थानावर राहणार हेही निश्चित झाले आहे.

# कोहलीची विराट विक्रमाशी बरोबरी

## कोहलीने केली सचिनच्या विक्रमाशी बरोबरी

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**वन-डे वर्ल्डकप स्पर्धेमध्ये द. आफ्रिकाविरूद्धच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना विराट कोहलीने खास विक्रम आपल्या नावावर केला आहे. त्याने भारताचा माजी दिग्गज फलंदाज सचिन तेंडुलकरच्या विक्रमाशी बरोबरी केली. सचिनने वन-डे क्रिकेटमध्ये 463 सामन्यांमध्ये 453 इनिंग खेळत 49 शतक झळकावली आहेत. विराट कोहलीने 289 सामन्यात 277 इनिंगमध्ये 49 झळकवत सचिनच्या विक्रमाशी बरोबरी केली आहेत.**

विराटने वन-डेमध्ये सर्वाधिक शतके श्रीलंकाविरूद्ध झळकावली आहेत. त्याने आत्तापर्यंत श्रीलंका संघाविरूद्ध सर्वाधिक 10 शतके झळकावली आहेत. भारतीय संघाचा माजी कर्णधार आणि स्टार फलंदाज विराट कोहली आज ( दि.५ नोव्हेंबर) 35 वर्षांचा झाला आहे. कोहलीसाठी वय हा फक्त एक आकडा आहे आणि त्यापेक्षा जास्त काही नाही. कारण विराट हा त्याच्या फिट बॉडी आणि फिटनेससाठी जगभर प्रसिद्ध आहे. अशा या क्रिकेटरने अनेक विक्रम आपल्या नावावर केले आहेत. विराटने 2008 मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तेव्हा तो अवघ्या 20 वर्षांचा होता. तेव्हापासून त्याने क्रिकेटच्या प्रत्येक फॉरमॅटवर वर्चस्व गाजवले आहे. सचिन तेंडुलकरच्या नावावर असे अनेक विक्रम होते जे कोणीही मोडू शकणार नाही असे वाटत होते, पण विराटने क्रिकेटच्या देवालाही मागे टाकले. इतिहास रचत विराटने अनेक विक्रम आपल्या नावावर केले. सातत्यपूर्ण धावा वसूल करत असल्यामुळे रन मशीन तर धावांचा पाठलाग करताना संघाला सामना जिंकून देण्याच्या क्षमतेमुळे विराटला चेस मास्टर म्हणतात.




### तेंडुलकरने विराटचे केले कौतुक

सचिन तेंडुलकरने कोहलीचे अभिनंदन करण्यासाठी ट्विटरचा वापर केला. माजी दिग्गजाने कोहलीचे ४९ व्या शतकाबद्दल केवळ अभिनंदनच केले नाही, तर त्याचा विक्रम मोडल्याबद्दल त्याला शुभेच्छाही दिल्या. सचिनने लिहिले, "विराट चांगला खेळलास. मला ४९ ते ५० शतकापर्यंत पोहोचण्यासाठी ३६२ दिवस लागले होते. पुढील काही दिवसांत तू ४९ वरून ५० वर पोहोचशील आणि माझा विक्रम मोडशील. अभिनंदन!

# धोनीचे निर्णय मला आवडले नाहीत : युवराज

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

टीम इंडियाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी आणि माजी अष्टपैलू युवराज सिंग यांच्या नात्याबाबत सोशल मीडियावर अनेकदा वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चा होत असतात. धोनीमुळेच युवराज सिंगची कारकीर्द लवकर संपुष्टात आली असे अनेकांचे मत आहे. पण आता खुद्द युवराज सिंग धोनी आणि त्याच्या नात्याबद्दल कॅमेऱ्यासमोर उघडपणे बोलला आहे.

युवीने एका यूट्यूबरला दिलेल्या मुलाखतीत अनेक मोठ्या गोष्टींचा खुलासा केला आहे. युवराज सिंगने युट्युब चॅनल टीआरएस क्लिप्सवरील संभाषणात धोनीसोबतच्या नात्याबद्दल सांगितले की, 'मी आणि माही जवळचे मित्र नाही. क्रिकेटमुळे आम्ही मित्र होतो, एकत्र खेळायचो. माहीची जीवनशैली माझ्यापेक्षा खूप वेगळी होती, त्यामुळे आम्ही कधीच जवळचे मित्र नव्हतो. आम्ही फक्त क्रिकेटमुळे मित्र होतो. जोपर्यंत मी आणि माही मैदानात होतो, तोपर्यंत आम्ही टीम इंडियासाठी 100 टक्के पेक्षा जास्त योगदान दिले. तो संघाचा कर्णधार आणि मी उपकर्णधार होतो. जेव्हा मी टीम इंडियात एन्ट्री घेतली तेव्हा मी चार वर्षांनी ज्युनियर होतो. जेव्हा तुम्ही कर्णधार आणि उपकर्णधार असाल तेव्हा निर्णयांमध्ये मतभेद असतील.' 'कधीकधी धोनीने असे निर्णय घेतले जे मला आवडले नाहीत, तर कधी मी त्याला न आवडणारे निर्णय घेतले. असे प्रत्येक संघात घडते. जेव्हा मी माझ्या करिअरच्या शेवटच्या टप्प्यात होतो, तेव्हा मला माझ्या करिअरबाबत अस्पष्टता दिसत होती, तेव्हा मी धोनीला सल्ला विचारला.